सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १०७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ४ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## आनंदाची बातमी! मान्सून केरळमध्ये दाखल, हवामान विभागाची घोषणा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४नागपूर-** यंदाच्या पावसाळ्याची सर्वाधिक प्रतीक्षा असलेली बातमी अखेर गुरुवारी मिळाली. नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांनी (मान्सून) ४ जून रोजी केरळमध्ये अधिकृतपणे प्रवेश केला. नेहमीच्या तारखेच्या तुलनेत यंदा मोसमी पावसाचे आगमन तीन दिवस उशिराने झाले असले तरी आता त्याच्या पुढील प्रगतीसाठी वातावरण अनुकूल बनले आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत मोसमी पाऊस गोव्याच्या संपूर्ण भागात, महाराष्ट्राच्या काही भागांत तसेच आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये पुढे सरकण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तविली आहे.

मोसमी पाऊस अखेर दाखल

साधारणपणे नैर्ऋत्य मोसमी पाऊस १ जून रोजी केरळ किनारपट्टीवर दाखल होतो. मात्र यंदा समुद्रावरील आणि वातावरणातील काही बदलांमुळे त्याच्या आगमनाला काही दिवसांचा विलंब झाला. अखेर गुरुवारी आवश्यक हवामानविषयक निकष पूर्ण झाल्यानंतर हवामान विभागाने मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल झाल्याची अधिकृत घोषणा केली. हवामान विभागाच्या माहितीनुसार, मोसमी पावसाने अरबी समुद्रातील दक्षिण-पश्चिम आणि दक्षिण-पूर्व भाग, मध्य अरबी समुद्रातील काही भाग, लक्षद्वीप बेटे, केरळ आणि माहेचा संपूर्ण प्रदेश, कर्नाटक व तामिळनाडूचा काही भाग तसेच बंगालच्या उपसागरातील विस्तृत क्षेत्र व्यापले आहे. त्यामुळे दक्षिण भारतात पावसाळ्याची औपचारिक सुरुवात झाली आहे.

### हवामान स्थिती बळकट

मोसमी पावसाच्याच्या आगमनासाठी आवश्यक असलेल्या हवामान स्थिती गेल्या दोन दिवसांत अधिक बळकट झाल्या. आग्नेय अरबी समुद्रावर संवहनी ढगांची निर्मिती मोठ्या प्रमाणात वाढली. समुद्रसपाटीपासून सुमारे साडेचार किलोमीटर उंचीपर्यंत पश्चिमेकडील दमदार वारे सक्रिय झाले. खालच्या स्तरावरील या वाऱ्यांचा वेग ताशी २० ते २५ नॉट्स इतका नोंदविण्यात आला. त्याचबरोबर केरळमध्ये गेल्या दोन दिवसांत बहुतांश भागांत व्यापक पाऊस झाला असून काही ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली. या सर्व बाबी मान्सूनच्या आगमनासाठी आवश्यक मानल्या जातात.

महाराष्ट्राच्या दक्षिण भागात मोसमी पावसाच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष आता मोसमी पावसाच्या पुढील वाटचालीकडे लागले आहे. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये सध्या ढगाळ वातावरण, स्थानिक पावसाच्या सरी आणि तापमानातील चढ-उतार अनुभवास येत आहेत. मोसमी पावसच्या प्रगतीचा वेग कायम राहिल्यास राज्यात लवकरच पावसाळ्याची सुरुवात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## काँग्रेस नेत्यांनीच भाजप उमेदवारासाठी पैसे वाटले;

### अग्रवालांचा गंभीर आरोप;

### अग्रवाल, कोठारींचीही माघार; अरुण लखानी अविरोध विजयी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४चंद्रपूर :** काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनीच भाजप उमेदवारासाठी पैसे वाटप केल्यामुळे काँग्रेसचे नगरसेवक सहलीला गेल्याचा गंभीर आरोप करीत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार शैलेश अग्रवाल यांनी आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतले. त्यांच्या या निर्णयामुळे काँग्रेसच्या वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे उमेदवार सुधीर कोठारी यांनीही उमेदवारी मागे घेतल्याने भाजपचे उमेदवार अरुण लखानी अविरोध विजयी झाले आहेत.

अग्रवाल उमेदवारी मागे घेणार असल्याची चर्चा बुधवारी सायंकाळपासूनच राजकीय वर्तुळात सुरू झाली होती. वर्धा येथे माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी काँग्रेसच्या नगरसेवकांच्या घरी भेट देण्यासाठी गेलो असता ते सहलीसाठी रवाना झाल्याने त्यांची भेट होऊ शकली नसल्याची खंत व्यक्त केली होती. त्याचवेळी मतांची जुळवाजुळव होत नसल्यामुळे अग्रवाल निवडणुकीतून माघार घेण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती.चंद्रपूर, वर्धा आणि गडचिरोली या तिन्ही जिल्ह्यांतील काँग्रेस नेत्यांकडूनही अपेक्षित पाठिंबा मिळत नसल्याचे चित्र होते. अखेर गुरुवारी दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास अग्रवाल जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले आणि त्यांनी आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतले. विशेष म्हणजे, नामनिर्देशन मागे घेताना त्यांच्या सोबत चंद्रपूर जिल्ह्यातील काँग्रेसचा एकही प्रमुख नेता उपस्थित नव्हता. यानंतर माध्यमांशी बोलताना अग्रवाल यांनी काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांवरच गंभीर आरोप केले. ''काँग्रेसमधील काही नेत्यांनी भाजप उमेदवारासाठी पैसे वाटप केले. त्यामुळेच काँग्रेसचे नगरसेवक आणि मतदार पर्यटनासाठी निघून गेले,'' असा दावा त्यांनी केला. निवडणूक प्रक्रिया आता केवळ पैशांचा बाजार बनली असून अनेक जण आर्थिक आमिषांना बळी पडत असल्याची टीकाही त्यांनी केली.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे उमेदवार सुधीर कोठारी यांनी पक्षाचे नेते सुनील तटकरे यांचा दूरध्वनी आल्यानंतर उमेदवारी मागे घेतल्याचे सांगितले.

## महायुतीच्या विजयाचा दावा; विदर्भातील पाचही जागा जिंकणार

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४नागपूर** महायुतीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये स्पष्ट संख्याबळ असून विदर्भातील पाचही जागासह राज्यातील सर्व १७ जागांवर महायुतीचा विजय निश्चित असल्याचा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.महसूलमंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवसाच्या पार्श्वभूमीवर बोलताना बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार तसेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अपक्ष उमेदवारांशी चर्चा केली असून महायुतीतील बहुतांश अपक्ष उमेदवार आपले अर्ज मागे घेतील.ज्या ठिकाणी काँग्रेसची स्थिती स्पर्धात्मक नाही,त्या ठिकाणी काँग्रेसनेही बिनविरोध निवडणुकीचा विचार करावा,असे आवाहन त्यांनी केले.ही निवडणूक जनतेची नसून संख्याबळावर आधारित असल्याने ज्या पक्षाकडे अधिक सदस्य आहेत,त्याच पक्षाचा विजय होणार असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर,भंडारा,अमरावतीसह राज्यातील सर्व १७ जागांवर महायुती विजयी होईल,असा विश्वास त्यांनी केला. महाविकास आघाडीनेही वास्तववादी भूमिका घेतल्यास महाराष्ट्रात काही ठिकाणी बिनविरोध निवडणुका होऊ शकतात,असे ते म्हणाले. महायुतीतील बंडखोरीबाबत विचारले असता,आमचे कार्यकर्ते पक्ष नेतृत्वाचे ऐकतील आणि बंडखोरीची शक्यता अत्यल्प असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. अब्दुल सत्तार यांच्याशी नुकतीच भेट झाल्याचे सांगत, काही मतभेद असले तरी मनभेद नसल्याचे त्यांनी नमूद केले.यवतमाळमध्ये काँग्रेसच्या उमेदवारीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, उमेदवारही विजयाची शक्यता लक्षात घेऊन निर्णय घेत असतात.विदर्भातील पाचही जागांवर महायुतीचा विजय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राहुल गांधींवर टीकाकाँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब कल्याणाला प्राधान्य देत देशाची अर्थव्यवस्था मजबूत केली आहे.त्यामुळे देशातील आर्थिक परिस्थितीबाबत राहुल गांधी यांनी केलेली टीका वास्तवापासून दूर असून ती हास्यास्पद आहे.

**बिनविरोध निवडणुकांसाठी काँग्रेसनेही विचार करावा**

**विप्लव बाजोरिया प्रकरणात न्यायालयावर विश्वास**

### विप्लव बाजोरिया प्रकरणात न्यायालयावर विश्वास

विप्लव बाजोरिया प्रकरणाबाबत बोलताना त्यांनी न्यायव्यवस्थेवर विश्वास व्यक्त केला. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय जे निर्णय देतील ते संबंधित आयोगाला मान्य करावे लागतील.या प्रकरणात सरकारने कोणताही हस्तक्षेप केलेला नाही,असे त्यांनी स्पष्ट केले.

## विधानपरिषदेच्या १७ पैकी ५ जागा बिनविरोध

### १२ ठिकाणी महायुती आणि मविआ आमने सामने, अमरावतीत होणार तिरंगी लढत










**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती** महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघाच्या १७ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. उमेदवारी अर्ज मागं घेण्याच्या दिवशी राज्यभरात मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या.

राज्यातील सत्ताधारी महायुतीच्या उमेदवारांसमोर महाविकास आघाडीनं आव्हान उभं करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मविआच्या काही उमेदवारांनी संख्याबळाचं कारण, मित्रपक्षांचं सहकार्य मिळत नसल्याचा आरोप करत माघार घेतली. तर, महायुतीच्या नेत्यांना देखील बंडखोरांना शांत करण्यात यश आलं. नितेश राणे थेट ठाकरेंच्या शिवसेनेचे कोकण विधानपरिषदेचे उमेदवार बाळ माने यांना अर्ज मागं घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले. तर, नाशिकमध्ये गोकुळ गीते अर्ज माघारीवरुन चर्चेत राहिले, तर गणेश गीते यांनी सकाळीच अर्ज मागं घेणार असल्याचं स्पष्ट केलं. अर्ज माघारीच्या दिवशी पाच जागा बिनविरोध झाल्या, यात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी काँग्रेस आणि एका जागेवर भाजपनं बिनविरोध विजय मिळवला.

अमरावती स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघात तिरंगी लढत होणार आहे. या मतदारसंघात भाजपचे प्रवीण पोटे पाटील, काँग्रेसचे हर्षजीत देशमुख आणि वंचितचे निलेश विश्वकर्मा आमने सामने आहेत.

## मतदानापूर्वीच एकनाथ शिंदेंना मोठे यश

## ठाण्यातील निवडणूक बिनविरोध



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ठाणे –** ठाणे-पालघर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषद निवडणुकीत अखेर मोठा राजकीय ट्विस्ट पाहायला मिळाला आहे. महायुतीचे उमेदवार रवींद्र फाटक यांच्या विजयाचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला असून ही निवडणूक आता बिनविरोध होण्याची शक्यता जवळपास निश्चित मानली जात आहे. महाविकास आघाडीच्या वतीने मैदानात उतरलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अभिजित पवार यांनी अचानक उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने संपूर्ण निवडणुकीचे चित्रच बदलले आहे. त्यामुळे ठाणे-पालघर मतदारसंघात आता केवळ औपचारिक घोषणा बाकी असल्याचे मानले जात आहे.

सुरुवातीला या मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट सामना रंगणार असल्याची चर्चा होती. महायुतीकडून माजी आमदार रवींद्र फाटक यांना उमेदवारी देण्यात आली होती, तर महाविकास आघाडीकडून अभिजित पवार रिंगणात उतरले होते. दोन्ही उमेदवारांनी अर्ज दाखल करताना मोठे शक्तीप्रदर्शन केले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळ आणि राजकीय वातावरण पाहता ही निवडणूक चुरशीची होईल, असा अंदाज राजकीय जाणकारांकडून व्यक्त केला जात होता. मात्र, अंतिम टप्प्यात घडलेल्या घडामोडींनी सर्वच समीकरणे बदलून टाकली.

अर्ज माघारीच्या प्रक्रियेदरम्यान अभिजित पवार यांनी अचानक आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना हा निर्णय वैयक्तिक कारणांमुळे घेतल्याचे सांगितले. त्यांच्या या निर्णयामुळे निवडणुकीतील एकमेव विरोधक मैदानाबाहेर गेला आणि रवींद्र फाटक यांच्यासमोर कोणतेही आव्हान उरले नाही. त्यामुळे आता मतदानाची आवश्यकता भासणार नसून रवींद्र फाटक यांची बिनविरोध निवड निश्चित झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.महायुतीचे उमेदवार रवींद्र फाटक यांच्या विजयाचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला असून ही निवडणूक आता बिनविरोध होण्याची शक्यता जवळपास निश्चित मानली जात आहे. महाविकास आघाडीच्या वतीने मैदानात उतरलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अभिजित पवार यांनी अचानक उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने संपूर्ण निवडणुकीचे चित्रच बदलले आहे.

## सुनेत्रा पवारांचा शरद पवारांना एक कॉल

### विधान परिषद निवडणुकीत शेवटच्या क्षणी आला मोठा ट्विस्ट



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४पुणे** –विधान परिषदेच्या १७ जागांसाठी राज्यात निवडणूक होत आहे. या निवडणुकीत पुणे विधान परिषदेच्या जागेवर अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून विक्रम काकडे निवडणुकीच्या मैदानात होते. याठिकाणी मविआकडून श्रीकांत पाटील यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. परंतु अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी नाट्यमय घडामोडी घडल्या आणि श्रीकांत पाटील यांनी निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे विक्रम काकडे यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला.याबाबत श्रीकांत पाटील यांनी म्हटलं की, सुनेत्रा पवार यांनी शरद पवार यांना कॉल केला होता. या फोननंतर साहेबांनी विचार बदलला. निवडणुकीत घोडेबाजार होऊ नये या दृष्टीने शरद पवारांनी सूचना करत निर्णय माझ्यावर सोपवला. घोडेबाजार होता कामा नये, सुनेत्रा वहिनींनी आपल्याला विनंती केली आहे त्यामुळे अर्जाबाबत तुम्ही ठरवा अशी सूचना पवारांनी केली. त्यानुसार मी अर्ज मागे घेतला आहे असं त्यांनी सांगितले.तसेच घोडेबाजार होऊ शकतो हे आधी लक्षात आले होते. या निवडणुकीत इतरही उभे राहतील असं वाटले होते. निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय मविआच्या वरिष्ठ पातळीवर झालेला आहे. हा निर्णय मलाही पटला त्यामुळे मी माघार घेतली आहे. कार्यकर्त्यांना काही अंदाज नसतो.

## संपादकीय ......

# बनावट बहिणींनी केले सरकारचे वांदे


कवयित्री इंदिरा संत यांची एक कविता आहे. 'लाडकी बाहुली होती माझी एक, मिळणार तशी ना शोधूनी दुसर्या लाख'. या कवितेचे महत्त्व कुणाला कळले नसले तरी महायुती सरकारला चांगलेच कळले आहे. मध्य प्रदेशमधील 'लाडली बहेना' महाराष्ट्रात 'लाडकी बहीण' नावाने जुलै २०२४ पासून नावारूपाला आली आहे. पण यातील अपात्र महिलांकडून पैस परत घेणार नाही, असे वक्तव्य मुख्यमंत्र्यांनी केल्यामुळे सरकारी तिजोरीवरील आर्थिक भाराचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. वास्तविक का खूप गंभीर प्रश्न आहे. मात्र, सरकार याबाबत खूप लवचिक धोरण स्वीकारत आहे. कदाचित त्यांना मतांची चिंता सतावत असावी. मे २०२४ मधील लोकसभा निवडणुकीत भाजप-शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्या महायुतीचे ४८ पैकी १७ जागांवर उमेदवार विजयी झाले तर शिवसेना (ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (पवार गट) आणि काँग्रेस यांच्या महाविकास आघाडीला ३० जागांवर विजय मिळाला होता. या धक्क्यातून सावरण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजना जुलै २०२४ पासून राबवायला सुरूवात केली. या योजनेचे मतदानरुपी फळ नोव्हेंबर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या पारड्यात पडले. त्यामुळे ही योजना महायुतीच्या अस्तित्वाची योजना बनली आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात लाडक्या बहिणींसाठी तब्बल २६ हजार ५०० कोटींची तरतूद केली आहे. लाडकी बहीण योजना २०२४ पासून कायम चर्चेत राहिली आहे. या योजनेसाठी इतर विकासकामांचा, योजनांचा निधी वळवल्याचा आरोप खुद्द सरकारमधील मंत्र्यांनीच केला होता. तर राज्याचे दिवाळे वाजेल आणि सरकारला योजना बंद करावी लागेल, असे तेव्हापासून विरोधक बोलत होते. त्यावेळी प्रत्येकवेळी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे मुख्यमंत्र्यासह सरकारमधील सर्व मंत्री, आमदार, नेते प्रत्येक भाषणात सांगत होते. अशी ही चर्चेत असलेली लाडकी बहीण योजना पुन्हा चर्चेत येण्याचे कारण म्हणजे अपात्र महिलांना तब्बल २४ हजार कोटी वाटल्याचा झालेला गंभीर आरोप. योजना सुरू झाली तेव्हा पहिल्या ऑगस्ट २०२४ मध्ये एकूण २ कोटी ४७ लाख महिलांना प्रत्येकी १५०० रुपयांचे मानधन देण्यात आले. तर दोन दिवसांपूर्वी लाडकी बहीण योजनेतील अधिकृत आकडा १ कोटी ६७ लाख झाला आहे. म्हणजेच तब्बल ८० लाख महिला या योजनेसाठी अपात्र ठरल्या आहेत. याचा अर्थ ८० लाख महिलांना राज्य सरकारकडून प्रत्येकी दीड हजार रुपये २२ महिने देण्यात आले. हे हजारो कोटी रुपये म्हणजे सरकारी तिजोरीवर एकप्रकारे डल्लाच म्हणावा लागेल.

लाडकी बहीण योजनेच्या निकषात बसत नसतानाही या ८० लाख बहिणींना जनतेच्या करातून जमा झालेले सरकारी पैसे खिरापतीप्रमाणे देण्यात आले. मुळात अर्ज आले आणि त्यांची कोणतीही तपासणी न करता सरसकट त्यांना मानधन देण्यात आले. गंभीर बाब म्हणजे यात तब्बल १४ हजार पुरुषांचाही समावेश आहे. शिवाय सरकारी नोकरीत असणार्या महिलांचाही समावेश आहे. यातील केवळ १४ हजार पुरुषांकडून पैसे वसूल केले जातील, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. वास्तविक सरकारी योजनेचा गैरफायदा घेणार्या सर्वांवर आधी गुन्हे दाखल व्हायला हवेत आणि त्यांच्याकडून व्याजासकट सर्व रक्कम वसूल करायला हवी. मात्र, २०२९ मधील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ईव्हीएममधून नाराजी उमटली तर काय, या भीतीने सरकारी तिजोरीवर डल्ला मारणार्यांबाबत कठोर पाऊले उचलताना दिसत नाही.खरेतर एवढा मोठा आर्थिक लाभ देताना त्यांची फूलप्रुफ तपासणी होणे गरजेचे होते. मात्र, विधानसभेची २०२४ मधील निवडणूक तोंडावर असल्यामुळे सरकारला असे काही करायचे नव्हते. त्यामुळे लाडकी बहीण योजना सरकारवर बोजा ठरली आहे. वास्तविक योजनेचे निकष ठरल्यानंतर आलेल्या सर्व अर्जांची छाननी व्हायला हवी होती. तसे झाले असते तर आज अपात्र ठरलेल्या ८० लाख महिला आणि १४ हजार पुरुष त्याचवेळी अपात्र ठरले असते आणि पैसा सरकारच्या तिजोरीतच राहिला असता. आता सरकार केवळ १४ हजार पुरुषांकडून पैसे वसूल करणार म्हणत असले तरी ते कशापद्धतीने करणार, त्यांच्यावर गुन्हे दाखल करणार का, याबाबत सरकारकडून काहीही स्पष्टता नाही. आणखी एक गंभीर बाब म्हणजे लाभार्थ्यांमधील तब्बल ५ लाख सरकारी कर्मचारी आहेत. हे म्हणजे कुंपणानेच शेत खाण्याचा प्रकार आहे. कुठल्याही निकषात बसत नसतानाही आणि हजारो-लाखो रुपये पगार घेणार्या सरकारी कर्मचार्यांनी दीड हजार रुपयांच्या हव्यासापोटी सरकारची फसवणूक करणे, हा गुन्हा आहे. त्यांच्यावर सरकारने कारवाई करणे अपेक्षित आहेच शिवाय त्यांच्याकडूनही मानधनाची रक्कम व्याजासह वसूल करायला हवी. योजना चांगली असली तरी ती कोणत्या हेतूने राबवत आहोत, याचे भान सरकारने राखले नाही. त्यामुळे लाडकी बहीण योजना केवळ मतदानाची योजना म्हणूनच जास्त चर्चेत राहिली, हे महायुती सरकारचे अपयश म्हणावे लागेल.

## पुस्तक परीक्षण...Soulina - The Fragrance of Memories

# आईच्या त्याग, प्रेम आणि संघर्षाला वाहिलेली शब्दांजली...




आजच्या वेगवान आणि भौतिकतावादी युगात नात्यांचे महत्त्व कमी होत चालल्याची खंत अनेकदा व्यक्त केली जाते. अशा काळात Soulina - The Fragrance of Memories हे पुस्तक वाचकांच्या मनाला स्पर्श करणारे, भावनांच्या गाभाऱ्यात घेऊन जाणारे आणि आईच्या अमूल्य योगदानाची जाणीव करून देणारे साहित्यकृती म्हणून समोर येते. लेखिका डॉ. शुभांगी अरुण जोशी यांनी आपल्या मातोश्रींना वाहिलेली ही शब्दांजली केवळ पुस्तक नसून त्यांच्या अंतःकरणातील भावना, आठवणी आणि कृतज्ञतेचा एक जिवंत दस्तऐवज आहे.पुस्तकाच्या प्रस्तावनेत लेखिका अत्यंत साध्या पण प्रभावी शब्दांत सांगतात की, हे पुस्तक केवळ शब्दांचा संग्रह नाही तर त्यांच्या हृदयाचे प्रतिबिंब आहे. आईच्या जीवनातील संघर्ष, त्याग, निस्वार्थ प्रेम, संयम आणि कुटुंबासाठी केलेल्या अविरत प्रयत्नांची नोंद या पुस्तकातून संवेदनशीलतेने करण्यात आली आहे. प्रस्तावनेतील प्रत्येक ओळ वाचकाला स्वतःच्या आईची आठवण करून देते.आई हे जगातील असे व्यक्तिमत्त्व आहे, जिच्या कष्टांचे आणि त्यागाचे मोल कोणत्याही मोजपट्टीने करता येत नाही. ती स्वतःच्या वेदना लपवून कुटुंबासाठी जगते. तिच्या अस्तित्वामुळे घराला घरपण मिळते. लेखिकेने आपल्या आईच्या जीवनाचा आढावा घेताना हेच वास्तव अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे. विशेष म्हणजे, आईने कधी प्रसिद्धीची अपेक्षा केली नाही, कधी स्वतःच्या संघर्षाचा गवगवा केला नाही; मात्र तिच्या शांत, संयमी आणि धैर्यशील स्वभावाने संपूर्ण कुटुंबाला आधार दिला. ही भावना पुस्तकात सातत्याने जाणवते.या पुस्तकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याची प्रामाणिकता. कृत्रिमता, अतिशयोक्ती किंवा दिखाऊ भावनिकता यांचा कुठेही अतिरेक जाणवत नाही. उलट प्रत्येक प्रसंग वास्तवाशी जोडलेला वाटतो. लेखिकेने आपल्या आठवणींना शब्दबद्ध करताना भावनांचा ओघ कायम ठेवला असून वाचकाला त्या प्रवासात सहभागी करून घेतले आहे.आजच्या पिढीला आई-वडिलांच्या त्यागाचे महत्त्व समजून घेण्यासाठी असे साहित्य अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे वाढत चाललेला व्यक्तिवाद आणि नात्यांमधील दुरावा कमी करण्यासाठी अशा पुस्तकांची भूमिका महत्त्वाची ठरते. Soulina - The Fragrance of Memories हे पुस्तक केवळ एका आईची कथा नाही; ती प्रत्येक त्या आईची कथा आहे जिने आपल्या मुलांसाठी स्वतःचे आयुष्य समर्पित केले आहे.लेखनशैलीच्या दृष्टीने पाहिले तर भाषा साधी, प्रवाही आणि हृदयस्पर्शी आहे. प्रत्येक परिच्छेदातून लेखिकेची आईबद्दलची अपार श्रद्धा आणि प्रेम प्रकर्षाने जाणवते. साहित्यिक अलंकारांचा अतिरेक न करता सरळ, भावनिक आणि परिणामकारक मांडणी करण्यात आली आहे. त्यामुळे हे पुस्तक सर्वसामान्य वाचकांपासून साहित्यप्रेमींपर्यंत सर्वांना सहज भावते.या पुस्तकाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते वाचकाला आत्मपरीक्षण करायला भाग पाडते. आपण आपल्या आई-वडिलांबद्दल किती कृतज्ञ आहोत? त्यांच्या त्यागाचे मोल आपण खरोखर जाणतो का? त्यांच्या भावना समजून घेण्यासाठी आपण किती वेळ देतो? असे अनेक प्रश्न हे पुस्तक नकळत वाचकासमोर उभे करते.एकूणच, Soulina - The Fragrance of Memories ही केवळ आठवणींची मांडणी नसून आईच्या निस्वार्थ प्रेमाला, तिच्या संघर्षाला आणि तिच्या जीवनमूल्यांना वाहिलेली एक भावपूर्ण आदरांजली आहे. आईच्या ममतेचा सुगंध शब्दांच्या माध्यमातून अनुभवायचा असेल, तर हे पुस्तक अवश्य वाचावे. भावनिक, प्रेरणादायी आणि मूल्याधिष्ठित साहित्याच्या शोधात असलेल्या वाचकांसाठी हे पुस्तक निश्चितच एक संस्मरणीय अनुभव ठरेल.

**विलास अरुण मराठे**
अमरावती
मो.९८२३०७२७२७



# कर वसुलीला गती द्या; थकबाकीदारांवर कठोर कारवाई करा - आयुक्त वर्षा लड्डा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती**अमरावती महानगर पालिकेच्या आयुक्त वर्षा लड्डा यांनी मंगळवारी महानगरपालिकेच्या कर विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत महसूल वाढ आणि थकबाकी वसुलीसाठी कठोर व परिणामकारक उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे झालेल्या बैठकीत कर वसुलीची सद्यस्थिती, थकबाकी वसुली, महसूल वाढ तसेच झोननिहाय प्रगतीचा आढावा घेण्यात आला.बैठकीत मालमत्ता कर वसुलीची सविस्तर आकडेवारी सादर करण्यात आली. उद्दिष्टांच्या तुलनेत कमी वसुली असलेल्या वार्डांची स्वतंत्र समीक्षा करत आयुक्त वर्षा लड्डा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने वसुली वाढविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले. प्रत्येक झोनने निश्चित उद्दिष्टांसह कार्य करून नियमित प्रगती अहवाल सादर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.महानगरपालिकेच्या आर्थिक बळकटीसाठी कर वसुली हा प्रमुख आधारस्तंभ असल्याचे नमूद करत आयुक्तांनी मोठ्या थकबाकीदारांची स्वतंत्र यादी तयार करून विशेष वसुली



मोहीम राबविण्याचे आदेश दिले. नियमानुसार जप्ती, सीलिंग आणि अन्य कायदेशीर कारवाई करून थकबाकी वसुलीची प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याच्या सूचना देण्यात आल्या.नागरिकांना कर भरण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने ऑनलाइन कर भरणा प्रणालीचा अधिक प्रचार, व्यापक जनजागृती मोहीम तसेच कर भरणा प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यावर भर देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.बैठकीदरम्यान महसूल वाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष उपक्रमांचीही समीक्षा करण्यात आली. नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करून करदात्यांना दर्जेदार व सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. तसेच सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी मालमत्ता कर विभागाशी आवश्यक समन्वय ठेवून मालमत्ता कर वसुली मोहिमेस पूर्ण सहकार्य करावे, असे निर्देश आयुक्त वर्षा लड्डा यांनी दिले.यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना महसूल वाढीचे उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी जबाबदारीने व समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. शहरातील विकासकामांसाठी आवश्यक आर्थिक स्रोत उपलब्ध करून देण्यासाठी कर वसुलीत कोणतीही ढिलाई खपवून घेतली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक संचालक नगररचनाकार सागर वानखडे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी, उपअभियंते, कर वसुली लिपिक तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

# धारणीत अचानक काही कृषी केंद्रांचे शटर डाऊन

## भरारी पथकाच्या चर्चेनंतर कृषी दुकाने बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४धारणी,** धारणी तालुक्यात बुधवार ३ जून रोजी काही ठराविक कृषी केंद्रांनी अचानक शटर डाउन केल्याने ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. कृषी विभागाचे अमरावती जिल्हास्तरीय भरारी पथक तालुक्यात तपासणीसाठी येणार असल्याची माहिती पसरल्यानंतर काही कृषी विक्रेत्यांनी आनन-फाननमध्ये दुकाने बंद केल्याचे सांगितले जात आहे. धारणी तालुक्यातील कुसुमकोट बु. गावातील अचानक एकापाठोपाठ तब्बल पाच कृषी केंद्रांचे शटर डाउन झाल्यानंतर चर्चेला उधाण आले आहे. विशेष म्हणजे, ग्रामीण भागातील काही कृषी केंद्रे बंद असताना धारणी शहरातील बहुतांश कृषी दुकाने नियमितपणे सुरू होती. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना खत, बियाणे व कीडनाशक खरेदीसाठी धारणी शहराकडे धाव घ्यावी लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. सूत्रांपासून मिळालेल्या एका विशेष माहितीनुसार कुसुमकोट बु. येथे सकाळी सुमारे




**खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांमध्ये संभ्रम कुसुमकोट बु. येथील पाच कृषी केंद्राची सुद्धा जोरात चर्चा**


११.३० नंतर काही कृषी खतांची दुकाने अचानक बंद करण्यात आली. त्याचप्रमाणे डाबका, कळमखार तसेच सुसर्दा परिसरातील काही कृषी केंद्रेही बंदअसल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. अचानक शटर डाउन झाल्याने परिसरात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, कृषी विभागाच्या नियमानुसार कोणत्याही कृषी केंद्राला बियाणे, खते व कीडनाशक विक्रीसाठी वैध परवाना, साठा नोंदवही, बिले, गुणवत्ता प्रमाणपत्र तसेच शासनमान्य नोंदी ठेवणे बंधनकारक असते. तसेच बनावट बियाणे, अनधिकृत औषधे किवा परराज्यातून अवैधरीत्या माल आणून विक्री करणे हा गंभीर कायदेशीर गुन्हा मानला जातो. स्थानिक नागरिकांनी काही प्रश्न उपस्थित केले असून, अचानक दुकाने बंद करण्यामागे नेमके कारण काय, संबंधित कृषी केंद्रांकडे आवश्यक परवाने आहेत का, विक्री होणाऱ्या बियाणे व औषधांची गुणवत्ता प्रमाणित आहे का, तसेच मध्यप्रदेशातून अवैधरित्या कृषी साहित्याची तस्करी होत आहे का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

# वाघिण नव्हे तर तिचे शावक परतवाड्यात

## वन विभागाचे स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती** सिंदेवाही परिक्षेत्र (ब्रह्मपुरी प्रादेशिक वनविभाग) येथील 'ढ२' नामांकित वाघिणीच्या शावकासंदर्भात प्रसिद्ध झालेली माहिती वस्तुस्थितीला धरून नाही. या चुकीच्या बातम्यांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये अनावश्यक भीतीचे आणि वन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत गैरसमजाचे वातावरण निर्माण होत असल्याचे वन विभागाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. सिंदेवाही परिक्षेत्रातील 'ढ२' वाघीण मानव-वन्यजीव संघर्ष निर्माण करत असल्यामुळे, वनविभागाने



खबरदारीचा उपाय म्हणून तिला तिच्या शावकांसह सुरक्षितपणे पकडले आहे. मात्र, वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्याप्रमाणे 'ढ२' वाघिणीला परतवाडा येथे हलवलेले नसून, तिच्या शावकांपैकी एका शावकाला 'ढ२ उँील १' पुढील आवश्यक व्यवस्थापन, सुरक्षितता आणि वैद्यकीय देखरेखीच्या दृष्टीने परतवाडा ट्रान्झिटट्रीटमेंट सेंटर येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.या शावकाला मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सोडण्याच्या अफवा देखील पसरत आहेत, परंतु सद्यस्थितीत या 'ढ२ उँील १' शावकास मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये सोडण्याचा किवा मुक्त अधिवासात पुनर्स्थापित करण्याचा कोणताही निर्णय अथवा योजना नाही.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे ६ जूनला जिल्ह्यात 'मेगा कृषी क्रेडिट आउटरीच कॅम्प'

## सर्व ४५ शाखांमध्ये जागेवरच होणार कर्जवाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती** शेतकरी आणि कृषी क्षेत्राशी संबंधित व्यावसायिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने शनिवार, दि. ६ जून २०२६ रोजी अमरावती जिल्ह्यात भव्य 'मेगा कृषी ऋण आउटरीच कॅम्प'चे आयोजन करण्यात आले आहे. दर्यापूर येथील माहेश्वरी भवन येथे सकाळी ११ वाजता या मुख्य कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक निकेतन कदम उपस्थित राहणार असून सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या केंद्रीय कार्यालयाचे उपमहाप्रबंधक सचिन सुधाकर, अमरावतीचे क्षेत्रीय प्रमुख सुनील पाण्डेय उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. हा कॅम्प केवळ एकाच ठिकाणी मर्यादित नसून अमरावती जिल्ह्यातील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या सर्व ४५ शाखांमध्ये एकाच वेळी आयोजित केला जाणार आहे, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. या




मेळाव्यामध्ये शेती आणि पूरक व्यवसायांना गती देणाऱ्या महत्त्वाच्या योजनांची माहिती दिली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने किसान क्रेडिट कार्ड , कृषी पायाभूत सुविधा निधी, ग्रामीण गोदाम भंडारण, कोल्ड स्टोरेज (शीतगृह) आणि महिला बचत गट यांसारख्या शासकीय व बँक योजनांचा समावेश आहे. या कॅम्पमध्ये पात्र लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची छाननी करून जागेवरच मंजुरी पत्र आणि थेट कर्जवाटप केले जाणार आहे. हा कृषी मेळावा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आणि शेतीशी संबंधित व्यवसाय करणाऱ्यांसाठी विशेष संधी निर्माण करणारा आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आणि कृषी उद्योजकांनी शनिवार, दि. ६ जून रोजी आपल्या जवळच्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखेत किंवा दर्यापूर येथील मुख्य कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित राहून या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावतीचे अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेड़ाऊ यांनी केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# जनगणना कार्यात अचूकता आणि वेळेवर पूर्णत्वाला प्राधान्य;

## ५ जूनपर्यंत काम पूर्ण करण्याचे आयुक्त वर्षा लड्ढा यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती,**

आगामी जनगणना प्रक्रियेच्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिका प्रशासनाने कामाला गती देत झोननिहाय आढावा बैठक आयोजित केली. अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्ढा यांच्या अध्यक्षतेखाली आज विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे पर्यवेक्षक, चार्ज अधिकारी आणि जनगणना कार्याशी संबंधित अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत जनगणना संचालनालयाने नुकत्याच घेतलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगमध्ये दिलेल्या सूचनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.यावेळी आयुक्त वर्षा लड्ढा यांनी सांगितले की, जनगणना ही देशाच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून त्यामध्ये नोंदविण्यात येणारी प्रत्येक माहिती अचूक, विश्वासार्ह आणि अद्ययावत असणे आवश्यक आहे. त्यामुळे क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या प्रगणकांनी भरलेल्या माहितीची काटेकोर तपासणी करणे आणि आवश्यक तेथे तात्काळ सुधारणा करणे ही सर्व संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे.त्या अनुषंगाने चार्ज अधिकारी स्तरावर माहितीची पडताळणी स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले.बैठकीत प्रगणक, पर्यवेक्षक आणि चार्ज अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली. क्षेत्रीय कार्यामध्ये प्रगणकांकडून संकलित करण्यात येणारी माहिती योग्य प्रकारे भरली जात आहे किंवा नाही, याची दैनंदिन तपासणी पर्यवेक्षकांनी करावी. तसेच चार्ज अधिकाऱ्यांनी देखील नियमितपणे माहितीचे परीक्षण करून कोणतीही चुकीची किंवा अपूर्ण माहिती प्रणालीवर अपलोड होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे सांगण्यात आले.आयुक्तांनी सर्व चार्ज अधिकारी आणि पर्यवेक्षकांना त्यांच्या अधिनस्त प्रगणकांचे काम नियोजित वेळेत पूर्ण होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश दिले. प्रत्येक गटाचे क्षेत्रीय काम ५ जून २०२६ पर्यंत पूर्ण होईल, यासाठी आवश्यक नियोजन, समन्वय आणि



पाठपुरावा करण्यावर भर देण्यात आला.याशिवाय, प्रगणकांनी क्षेत्रातून गोळा केलेली माहिती वेळेवर 'सिंक' करणे अत्यंत आवश्यक असल्याचे आयुक्तांनी नमूद केले. माहिती संकलनानंतर ती तात्काळ प्रणालीमध्ये अद्ययावत न झाल्यास डेटामध्ये विसंगती निर्माण होण्याची शक्यता असल्याने सर्व पर्यवेक्षकांनी आपल्या अधिनस्त प्रगणकांना नियमितपणे डेटा सिंक करण्याबाबत सूचना द्याव्यात, असे त्यांनी सांगितले.बैठकीत माहितीतील त्रुटी आणि दुरुस्ती प्रक्रियेबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. मुख्य क्षेत्रीय काम ५ जूनपूर्वी पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश देण्यात आले.आयुक्त वर्षा लड्ढा यांनी पर्यवेक्षकांच्या भूमिकेवर विशेष भर देत सांगितले की, प्रत्येक पर्यवेक्षकाने दररोज सायंकाळी आपल्या अधिनस्त प्रगणकांची बैठक घेणे अनिवार्य राहील. या बैठकीमध्ये दिवसभरातील कामाचा आढावा घेणे, आलेल्या अडचणी समजून घेणे, माहितीची गुणवत्ता तपासणे आणि डेटा सिंक झाल्याची खात्री करणे आवश्यक आहे. नियमित आढावा बैठकीमुळे जनगणना कार्य अधिक प्रभावीपणे आणि अचूकतेने पूर्ण होण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.चार्ज अधिकाऱ्यांनाही त्यांच्या झोनमधील संपूर्ण डेटा तपासण्याचे निर्देश देण्यात आले. आवश्यक असल्यास प्रत्यक्ष क्षेत्रभेटी घेऊन भरलेल्या माहितीची खातरजमा करावी, तसेच नागरिकांकडून मिळालेली माहिती आणि प्रणालीमध्ये नोंदविलेली माहिती यामध्ये सुसंगती असल्याची खात्री करावी, असेही सांगण्यात आले.बैठकीच्या शेवटी आयुक्तांनी सर्व अधिकारी, पर्यवेक्षक आणि प्रगणकांना जनगणना कार्य ही अत्यंत जबाबदारीची प्रक्रिया असल्याचे स्मरण करून दिले. अचूक माहिती, नियमित डेटा सिंक, सातत्यपूर्ण पडताळणी आणि वेळेवर काम पूर्ण करणे या चार बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन त्यांनी केले. सर्व झोनचे काम ५ जून २०२६ पर्यंत पूर्ण होईल यासाठी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करण्याचे निर्देश दिले.या बैठकीत अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त तथा चार्ज अधिकारी नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, सहाय्यक शहर जनगणना अधिकारी अधिकारी अक्षय निलंगे, पर्यवेक्षक उपस्थित होते.

# अमरावती शहरातील अनधिकृत शाळांची यादी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती** राज्यभरात जिकडेतिकडे इंग्रजी शाळांचे पेव फुटले असून पालकांची धाव सध्या इंग्रजी शाळांकडेच दिसून येत आहे. मात्र यामधील काही शाळा विनापरवानगी चालू असल्याचे निष्पन्न लक्षात आल्यानंतर अमरावती महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे शहरातील अशा शाळांची तपासणी करण्यात आली. तपासणी वेळी काही शाळा विनापरवानगी व मान्यतेच्या शिवाय सुरू असल्याचे लक्षात आले आहे. यामध्ये वलगाव रोड येथील फाल्कन इंग्लिश स्कूल , पुंडलिक बाबा नगर येथील विजार्ड इंग्लिश स्कूल व जमीन कॉलनी मधील गोल्डन स्टार इंग्लिश स्कूल या शाळा अनाधिकृत असल्याचे महानगरपालिका शिक्षण विभाग अमरावती यांच्यावतीने जाहीर करण्यात आलेले आहे. तसेच




### विनापरवानगी व मान्यतेच्या शिवाय सुरू होत्या शाळा

पालकांनी सदर शाळेमध्ये प्रवेश घेतल्यास भविष्यात पाल्याच्या शैक्षणिक नुकसानीस पालक स्वतः जबाबदार राहतील अशी भूमिका शिक्षण विभागांच्या वतीने जाहीर करण्यात आलेली आहे.तसेच शहरातील शाळांमध्ये प्रवेश घेतेवेळी पालकांनी शाळा संबंधीत सर्व माहिती, कागदपत्रे याबाबतची तपासणी करूनच प्रवेश घेण्याबाबत निर्णय घ्यावा असे आवाहन सुद्धा यावेळेस शिक्षण विभाग महानगरपालिका यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

# अमरावती 'मॉसिकॉल'ची जागा सरकार जमा

## शासकीय इमारती, कामकाजासाठी जागा वापरणार

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेयांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई** शहराच्या मध्यवर्ती भागातील 'मॉसिकॉल' कारखान्याची बावीस एकर जमीन खाजगी व्यक्तींना विकण्याऐवजी सार्वजनिक आरक्षित कामांसाठी व शासकीय इमारतींच्या बांधकामासाठी महसूल विभागाकडे जमा करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेयांनी बुधवारीदिले. याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवला जाईल, असे महसूलमंर्त्यांनी सांगितले.

अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी या जमिनीचा वापर सार्वजनिक हितासाठी व्हावा, अशी आग्रही मागणी केल्याने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील आयोजित बैठकीत हा निर्णय



घेण्यात आला. बैठकीला आमदार संजय खोडके यांच्यासह अमरावती विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्ढा आणि महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य तेलबिया वाणिज्य व औद्योगिक महामंडळ मर्यादित (मॉसिकॉल) च्या अखत्यारित असलेली २२.९२ एकर (९.१७ हेक्टर) मोकळी जमीन खाजगी विक्रीसाठी पुन्हा एकदा ई-निविदा प्रक्रिया राबवून विकण्याचे नियोजन सुरू होते. मात्र, अमरावती शहराचा वाढता विस्तारलक्षात घेता जिल्हा स्तरावरील विविध शासकीय इमारती, नवीन न्यायालयीन संकुल तसेच अन्य सार्वजनिक सुविधांसाठी शहराच्या मध्यवर्ती भागात अशा मोठ्या भूखंडाची अत्यंत आवश्यकता आहे. ही शासकीय मालकीची जागा खाजगी व्यक्तींच्या घशात घालण्याऐवजी ती भविष्यातील सार्वजनिक गरजांसाठी आरक्षित ठेवावी, अशी मागणी मागणी होती.

### विषय मंत्रि मंडळासमोर मांडणार

कापूस पणन महासंघाने या जागेवर ७५ कोटी रुपये खर्च केले आहेत, परंतु त्यांच्या संचालक मंडळात जमिनीच्या विक्रीबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. जागा शहराच्या मध्यवर्ती भागात असल्यानेराज्य सरकारच्या विविध विभागांच्या इमारतींसाठी ती अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळेविभागीय आयुक्तांनी मॉसिकॉलची संपूर्ण जागा तात्काळ ताब्यात घेण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, असे आदेश महसूलमंत्री बावनकुळेयांनी दिले.

# चोरट्यानी गुरुदेवनगर येथे सीसी टीव्ही निष्क्रिय करून लाखोंची रोकड लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४तिवसा** तिवसा पोस्टे हद्दीतील गुरुदेवनगर (मोझरी) येथील हेमंत बोबडे यांचे मकाणावर सुरक्षा हेतूने लावलेले सीसी टीव्ही कॅमेरे तोडून मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी अत्यंत धाडसी घरफोडी करत तब्बल ६ लाख २७ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची खळबळजनक घटना घडली. विशेष म्हणजे, चोरट्यांनी घरातील सीसीटीव्ही यंत्रणा पूर्णपणे निष्क्रिय करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.प्राप्त माहितीनुसार हेमंत सुरेशराव बोबडे (वय ४०) हे गुरुदेव नगर येथील सेवा शांती चाळीत वास्तव्यास असून रेती ट्रक व्यवसाय करतात. त्यांच्या घराच्या तळमजल्यावर ते राहत असून वरच्या मजल्यावर त्यांची आई एकटी राहते. पत्नी प्रसुतीसाठी गेल्या चार महिन्यांपासून माहेरी असल्याने घरात वर्दळ कमी होती.बोबडे यांनी ले-आऊट व्यवहार व ट्रक भाडयाच्या उत्पन्नातून मिळालेली ६.२७ लाख रुपयांची रक्कम बेडरूममधील लाकडी कपाटात ठेवली होती. तसेच



दुसऱ्या खोलीतील लोखंडी कपाटात ७० हजार रुपये व सोन्याचे दागिने ठेवण्यात आले होते.२ जूनच्या रात्री सुमारे १०.३० वाजता बोबडे हे मित्रासोबत कामानिमित्त अमरावतीला गेले असता, चोरट्यांनी ही संधी साधली. त्यांनी घराच्या मुख्य दरवाज्याचे कडी-कुलूप तोडून आत प्रवेश करत थेट बेडरूम गाठली व लाकडी कपाट उघडून त्यातील संपूर्ण रोकड लंपास केली.यानंतर चोरट्यांनी दुसऱ्या बेडरूममधील लोखंडी कपाट फोडण्याचा प्रयत्न केला, मात्र तो निष्फळ ठरल्याने तेथील रोकड व दागिने सुरक्षित राहिले. या प्रकारावरून चोरट्यांना घरातील रचना व पैशांच्या ठिकाणाची पूर्वकल्पना असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे.दरम्यान, चोरट्यांनी अत्यंत शिताफीने घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा ऊतठ बंद करून त्याचा पॉवर सप्लाय काढून नेला. तसेच घराबाहेरील कॅमेरेही तोडफोड करून निष्क्रिय करण्यात आले. यामुळे घटनेचे कोणतेही दृश्य पुरावे मिळू नयेत, याची पूर्ण खबरदारी घेण्यात आली होती.३ जून रोजी पहाटे सुमारे ३ वाजता बोबडे घरी परतले असता घराचे गेट व मुख्य दरवाजा उघडा आढळून आला. दरवाज्याचे तुटलेले कुलूप पाहून त्यांनी घरात धाव घेतली असता चोरीचा प्रकार उघडकीस आला.या प्रकरणी तिवसा पोलीसानी घटनास्थळी धाव घेत सदर घटनेचा पंचनामा करून श्वास पथकास पाचारण करण्यात आले होते ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. परिसरातील नागरिकांना रात्रीच्या वेळी अधिक सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहेप्रकरणी ठाणेदार गोपाल उपाध्याय यांचे मार्गदर्शनात तपास सुरु आहे


# पुनर्वसनाशिवाय धरणाचे काम नाही!

## ग्रामस्थांनी धरणाचे काम पाडले बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

पेढी बॅरेजसाठी तब्बल ८५० एकर जमीन देऊन विस्थापित झालेल्या रोहणखेडा-पर्वतापूर येथील नागरिकांचा संयम अखेर संपला असून पुनर्वसनाच्या मागणीसाठी त्यांनी थेट धरणाच्या कामावरच ब्रेक लावला आहे. आधी पुनर्वसन, मग धरणाचे काम अशी ठाम भूमिका घेत संतप्त ग्रामस्थांनी पुनर्वसन स्थळी सुरू असलेले धरणाचे काम बंद पाडत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

गेल्या अनेक वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रश्नावर प्रशासनाकडून केवळ आश्वासने



दिली जात असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मौजे रामगाव येथील गट क्रमांक ४३ ची जमीन संपादित होऊन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असताना गट क्रमांक ११९ च्या संपादनाबाबत मात्र जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

२ जून रोजी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांना निवेदन देऊनही प्रशासनाने कोणतीही सकारात्मक भूमिका न घेतल्याने संतप्त नागरिकांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. धरणासाठी जमीन दिल्यानंतर शेती, रोजगार आणि उदरनिर्वाहाची साधने हिरावली गेली असून अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. प्रशासनाला धरणाचे काम महत्त्वाचे वाटते, मात्र ज्यांच्या जमिनी गेल्या त्या विस्थापितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न दुर्लक्षित केला जात आहे. आमच्या हक्काचे पुनर्वसन मिळाल्याशिवाय धरणाचे काम पुढे जाऊ देणार नाही, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. यावेळी सतीश गोटे, किशोर भेलकर, मोना भिलकर, राजेश तायडे, ललिता खडसे, जयश्री देशभ्रतार, रवी कोल्हे, शितल वाळके, प्रवीण तायडे, सुनील खडसे, निलेश कडू, नितीन रायबोले, आकाश खडसे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

### जखमांवर मीठ चोळण्याचा प्रकार

विस्थापितांचे पुनर्वसन प्रलंबित असताना धरणाचे काम सुरू ठेवण्याचा प्रशासनाचा हट्ट संतापजनक आहे. एकीकडे नागरिकांच्या जीवन मरणाचा प्रश्न उपस्थित असताना शासनाकडून नागरिकांच्या जखमांवर मीठ चोळण्याचा हा प्रकार आहे. पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने मार्गी न लागल्यास आंदोलन आणखी तीव्र होईल. **-सतीश गोटे संचालक, कृ.उ.बा.स. अमरावती** तथा निवेदनकर्ते

# शाळा उघडताच इंधन दरवाढीचा पालकांना बसणार फटका

## अमरावती शहरात सहाशेवर स्कूल व्हॅन व बसने होते वाहतूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** इंधन दरवाढीचा फटका शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर पालकांनाही बसणार आहे. गतवर्षीपेक्षा १५ ते २० टक्के भाडेवाढीचे संकेत विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनचाकांच्या संघटनेने दिल्याने पालकांची चिंता वाढली आहे. शहर व ग्रामीण भागात सहाशेवर स्कूलबस व व्हॅनने विद्यार्थ्यांची वाहतूक होते. शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक व्हावी, यासाठी दरवर्षीच प्रशासकीय स्तरावरून खल सुरू असतो. जूनच्या शेवटच्या आठवड्यात शैक्षणिक सत्र सुरू होण्याचे संकेत आहेत. अमरावती शहर व ग्रामीण भागात दहा विद्यार्थी क्षमतेसह ३५ ते ५०, अशा क्षमतेच्या बसने विद्यार्थ्यांची वाहतूक होते. काही स्कूलव्हॅन व बस या खासगी विनाअनुदानित शाळेच्या मालकीच्या आहेत, तर त्यापेक्षा अधिक स्कूल व बस या स्वतंत्ररीत्या चालविल्या जातात. स्कूल बस व व्हॅनमध्ये विद्यार्थ्यांची वाहतूक सुरक्षितपणे व्हावी, यासाठी गृहविभागाने काही नियमावली आखून दिलेली आहे. त्या नियमावलीचे तंतोतंत पालन करणे स्कूल व्हॅन व बस चालकांना अवघड जात असल्याचे दिसून येते. मागील वर्षी कठोरा ते इर्विन चौक शाळेपर्यंतचे भाडे जर पंधराशे रुपये असेल तर ते अठराशे रुपये इथपर्यंत वाढू शकते. बडनेरा ते इर्विन चौकापर्यंत जर बाराशे असेल तर ते पंधराशे रुपयांपर्यंत होऊ शकते, असे स्कूल बस स्कूल व्हॅन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे पालकांना बोजा सहन करावा लागणार आहे.




पेट्रोल व डिझेल दरवाढीचा परिणाम सर्वच विभागांवर झालेला आहे. त्यामुळे यावर्षी शालेय विद्यार्थी वाहतुकीसाठी दरवाढ अटळ आहे. केवळ पेट्रोल-डिझेलच वाढले असे नाही, तर दर वर्षाला होणारे पासिंगचे शुल्क, वाहनाचा विमा यातही अपेक्षेपेक्षा अधिक वाढ झाली आहे. त्याचा आर्थिक बोजा स्कूल व्हॅन चालक व मालकांना पडतो. त्यामुळे यावर्षी काही प्रमाणात भाडेवाढ ही निश्चित होईल.

**-बंडू कथिलकर,** अध्यक्ष, शालेय विद्यार्थी वाहतूक संघ, अमरावती.

# ज्वारीचा पेरा बहात्तर हेक्टरवर, नोंदणी आठशे हेक्टरची

## खरी नोंदणी शोधण्याचे आदेश, ऑनलाइनमध्ये गोंधळ, तक्रारीनंतर थांबली मोजणी

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.४ अचलपूर**

अचलपूर तालुका कृषी विभागाने तालुक्यात ज्वारीचा पेरा ७२ हेक्टरवर झाल्याचा अहवाल दिला आहे. त्याच्या तुलनेत मात्र खरेदी-विक्री कार्यालयात ८०० हेक्टरची नोंदणी करण्यात आली आहे. ऑनलाइनमध्ये झालेल्या गोंधळाने याबाबत तक्रारी होताच मोजणी थांबविण्यात आली. आता तलाठ्यांमार्फत खऱ्या नोंदणी शोधण्याचे आदेश आल्याने शोधकाम सुरू झाले आहे. ३० मेपर्यंत खरेदी-विक्री कार्यालयात ज्वारीची नोंदणी सुरू होती. त्यावेळी तालुक्यातून ४९३ शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली होती. ज्यामध्ये ई-पीकपाहणीत ज्वारीचा पेरा दाखवून ऑनलाइन सातबारा देऊन नोंदणी करण्यात आली होती, हे विशेष. यावर्षी दीड महिन्याच्या कालावधीमध्ये ६०० अर्ज आले होते. त्यापैकी ४९३ अर्ज ऑनलाइन झाले. राज्य सरकारकडून खरेदी असल्यामुळे तहसील कार्यालयाच्या आदेशाने ज्वारीच्या खरेदीबाबत सर्व प्रक्रिया खरेदी-विक्री कार्यालयाकडून राबविण्यास सुरवात झाली. परंतु यादरम्यान ज्या शेतकऱ्यांच्याकडे ज्वारीची पेरणी झालीच नव्हती अशांनी सुद्धा ई-पीक पेऱ्याच्या माध्यमातून सातबाऱ्यावर ज्वारीचा पेरा दाखविला आणि त्या आधारे नोंदणी केली. त्यामुळे त्यांची संख्या अधिक व सुरवातीलाच नोंदविल्या गेली. अशावेळी खरे ज्वारी उत्पादक शेतकरी नोंदणीमध्ये मागे राहिले. पर्यायी त्यांचे नुकसान झाले, असे कारण देत खऱ्या ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांचा शोध घेऊन शासनाची दिशाभूल करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करून काही शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयात तक्रार दिली होती. त्यामुळे एक जूनला सुरू झालेली खरेदी प्रक्रिया थांबवून तलाठ्यांमार्फत खऱ्या ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांचा शोध घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तोपर्यंत मोजणीची प्रक्रिया बंद ठेवण्याचे सुद्धा आदेश तहसील कार्यालयाने दिले आहेत. ज्या शेतकऱ्यांनी तलाठ्यांच्या सहीचे सातबारे दिले अशाच शेतकऱ्यांची ज्वारी मोजण्यात यावी, असे आदेशसुद्धा देण्यात आले आहेत. खरेदी-विक्री कार्यालयाला यावर्षी सुरवातीला नऊशे व त्यानंतर साडेचार हजार क्विंटलपर्यंत ज्वारी मोजण्याचे टार्गेट होते. या आकडेवारीनुसार जास्तीत जास्त शंभर ते सव्वाशे अर्ज बसणार आहेत.तक्रारीनंतर ज्वारी मोजणीला ब्रेकज्या शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात ज्वारीची पेरणी केली नसतानाही ई-पीक पाहणीच्या आधारे नोंदणी केल्याचा आरोप काही शेतकऱ्यांनी केला आहे. यासंदर्भातील तक्रारीनंतर एक जूनपासून सुरू झालेली ज्वारी खरेदी व मोजणी प्रक्रिया तात्पुरती थांबविण्यात आली आहे. आता तलाठ्यांच्या प्रत्यक्ष पडताळणीनंतरच पात्र शेतकऱ्यांची ज्वारी मोजण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत.एक जूनच्या नोंदणीची चौकशी करातक्रार करणाऱ्या शेतकऱ्यांतही खऱ्या-खोट्यांचा ताळमेळ दिसून येत असल्यामुळे एक तारखेला झालेल्या नोंदणीचीसुद्धा चौकशी व्हावी, अशी मागणी एका शेतकऱ्याने केली आहे.

# अधिकाऱ्यांशी हुज्जत पडणार महागात

# बाजोरिया पिता-पुत्र अडचणीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

अमरावती विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अपक्ष उमेदवार तथा शिवसेनेचे बंडखोर नेते विप्लव बाजोरिया यांचा उमेदवारी अर्ज बाद झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात घडलेल्या वादाच्या घटनेने नवे वळण घेतले आहे. या प्रकरणी विप्लव बाजोरिया आणि त्यांच्या वडिलांविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.माहितीनुसार, उमेदवारी अर्जासंदर्भातील निर्णय जाहीर झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात बाजोरिया पिता-पुत्र आणि संबंधित अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक वाद झाला. अर्ज बाद झाल्यामुळे नाराज झालेल्या बाजोरिया यांनी निर्णयाबाबत तीव्र आक्षेप नोंदविल्याचे सांगितले जात आहे. या दरम्यान वातावरण काही काळ तणावपूर्ण झाले होते.घटनेचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला असून त्यामध्ये अधिकारी



## जिल्हाधिकारी कार्यालयातील वादाचा व्हिडिओ व्हायरल

आणि बाजोरिया पिता-पुत्र यांच्यात जोरदार वादावादी होत असल्याचे दिसून येत आहे. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर या प्रकरणाची अधिक चर्चा सुरू झाली आहे.प्रशासनाच्या तक्रारीनंतर संबंधितांविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण करणे आणि शासकीय कर्मचाऱ्यांशी वाद घालणे या आरोपांखाली गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.दरम्यान, विधान परिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज बाद झाल्यानंतर निर्माण झालेल्या या घडामोडींमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. व्हायरल व्हिडिओ आणि गुन्हा दाखल झाल्याच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अमरावती विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसला मिळणार बळ

## बंडखोर प्रशांत महल्ले यांची माघार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** अमरावती विधान परिषद निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर काँग्रेससाठी महत्त्वाची राजकीय घडामोड घडली आहे. काँग्रेसचे नगरसेवक तथा बंडखोर अपक्ष उमेदवार प्रशांत महल्ले यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेत अधिकृत उमेदवार हर्षजीत देशमुख यांना पाठिंबा जाहीर केला आहे.प्रशांत महल्ले यांनी सांगितले की, त्यांनी सुरुवातीला अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला होता, मात्र काँग्रेस पक्षाचा अधिकृत उमेदवार रिंगणात असल्याने आणि पक्षनिष्ठा महत्त्वाची मानत त्यांनी स्वेच्छेने माघार घेण्याचा निर्णय घेतला. मी काँग्रेस पक्षाचा नगरसेवक असून पक्ष माझ्यासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे पक्षासोबत राहणे आवश्यक असल्याची भूमिका मी घेतली, असे त्यांनी स्पष्ट केले.तसेच, काँग्रेसचे अधिकृत उमेदवार हर्षजीत देशमुख यांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे असल्याचे महल्ले यांनी सांगितले. पूर्ण अमरावती जिल्हा काँग्रेससोबत आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, महल्ले यांच्या माघारीमुळे काँग्रेसची ताकद वाढल्याचे मानले जात असून, निवडणुकीत पक्षाला याचा फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# बडनेरा उड्डाणपुलाच्या लोकार्पणासाठी मुख्यमंत्री येणार

## राणा दाम्पत्याकडून विशेष निमंत्रण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई/अमरावती**

आमदार रवी राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी बुधवारी मुंबईतील मुख्यमंत्री निवासस्थान ‘वर्षा’ येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेत बडनेरा जुनी वस्ती येथील नवनिर्मित रेल्वे उड्डाणपुलाच्या मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते लोकार्पणासाठी विशेष आग्रहाचे निमंत्रण दिले. राणा दाम्पत्याच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि प्रयत्नांमुळे साकार झालेला तब्बल ५४ कोटी रुपयांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प बडनेरा परिसराच्या विकासाला नवी गती देणारा ठरणार आहे. सुमारे तासभर चाललेल्या बैठकीत अमरावती जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.उड्डाणपूल आणि एफटीओ उद्घाटनाचा विषय चर्चेतभेटीदरम्यान राणा दाम्पत्याने मुख्यमंत्री फडणवीस यांना बडनेरा येथील बहुप्रतीक्षित रेल्वे उड्डाणपुलाचे लोकार्पण त्यांच्या शुभहस्ते करण्याची विनंती केली. तसेच अमरावती विमानतळाजवळ उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक फ्लाइंग



ट्रेनिंग ऑर्गनायझेशन (एफटीओ) केंद्राचे उद्घाटन लवकरात लवकर करण्यात यावे, अशी मागणीही केली. या प्रकल्पामुळे अमरावतीला राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळण्यासोबतच युवकांसाठी प्रशिक्षण व रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.विकासकामांना गती देण्यासाठी सखोल विचारविनिमयअमरावती जिल्ह्यातील विविध पायाभूत सुविधा प्रकल्प, जनकल्याणकारी योजना आणि प्रलंबित विकासकामांना गती देण्याच्या दृष्टीने बैठकीत सखोल चर्चा झाली. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध प्रस्तावांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याची माहिती राणा दाम्पत्याने दिली.जीएमसी कायम ठेवल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे मानले आभारबडनेरा मतदारसंघातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) कायम ठेवण्याचा निर्णय घेतल्याबद्दल राणा दाम्पत्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना उच्च वैद्यकीय शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार असून रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळण्यास मदत होईल. तसेच अमरावतीच्या आरोग्य क्षेत्राला अधिक बळकटी मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# मेळघाट व अचलपूर विधानसभा मतदारसंघातील पाणीटंचाई वर बच्चू कडूंचे ठिय्या आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

अचलपूर विधानसभा मतदारसंघासह मेळघाटातील नागरिकांना प्रशासकीय दिरंगाई आणि यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहण्याची वेळ येत असल्याचा आरोप करत आमदार बच्चू कडू यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जलजीवन मिशन प्रशासनाला कडक इशारा दिला होता. मेळघाट संघर्ष यात्रेदरम्यान त्यांनी पाणीप्रश्नावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला होता.

याच आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यात गुरुवारी अमरावती येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशिक कार्यालयात बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी मेळघाटातील विविध पाणीपुरवठा योजनांबाबतचे प्रश्न, रखडलेले प्रकल्प तसेच निधीअभावी थांबलेली कामे यावर अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

जोपर्यंत सुरू असलेले प्रकल्प तात्काळ पूर्ण होत नाहीत आणि मेळघाटातील जनतेला नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही, तसेच आवश्यक निधीची व्यवस्था केली जात नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, अशी भूमिका बच्चू कडू यांनी घेतली. त्यानंतर त्यांनी



कार्यकर्ते व नागरिकांसह कार्यालयातच ठिय्या आंदोलन सुरू केले.बच्चू कडू आंदोलनाला बसल्याची माहिती पसरताच प्रशासनात एकच खळबळ उडाली. विविध स्तरांवर हालचाली सुरू झाल्या आणि प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने प्रयत्न करण्यात आले. दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सचिव रंगा नायक यांनी बच्चू कडू यांच्याशी संपर्क साधून सध्या अस्तित्वात असलेली पाणीपुरवठाची कामे ही उन्हाळ्यात तात्काळ पूर्ण झाली पाहिजे अन्यथा ती पावसाळ्यानंतर पूर्ण करावी लागेल यामध्ये वाढीव निधीची गरज पडणार आणि त्याला वेगळी मान्यता घेण्याची गरज पडणार ही प्रक्रिया अडचणीची होईल त म्हणून सदर कामे ही पावसाळ्याचे पूर्वी वेळेत पूर्ण झाली पाहिजे त्यासाठी मेळघाटातील पाणीपुरवठा योजनांसाठी आवश्यक निधी तात्काळ उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद आणि निधी उपलब्धतेचे आश्वासन मिळाल्यानंतर बच्चू कडू यांनी आपले आंदोलन मागे घेतले. मात्र, आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही तर पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

# अमरावतीत ठाकरे गटाला मोठा धक्का

## जिल्हाप्रमुख नरेंद्र पडोळे यांचा राजीनामा, शिंदे गटात प्रवेशाची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४अमरावती –** आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अमरावतीतील ठाकरे गटाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. अचलपूर व मेळघाट विधानसभा क्षेत्राचे जिल्हाप्रमुख नरेंद्र पडोळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. पडोळे यांच्या राजीनाम्यामुळे स्थानिक राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, शिवसेना नेते बच्चू कडू यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर पडोळे यांनी हा निर्णय घेतला. तसेच ते लवकरच बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. मात्र, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.दरम्यान, पक्षातील अंतर्गत गटबाजी, संघटनात्मक पातळीवरील मतभेद आणि कार्यकर्त्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे पडोळे नाराज असल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांनी राजीनाम्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.नरेंद्र पडोळे हे अचलपूर आणि



मेळघाट परिसरातील सक्रिय पदाधिकारी मानले जातात. त्यांच्या राजीनाम्यामुळे ठाकरे गटाच्या संघटनात्मक ताकदीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी हा राजकीय घडामोडींचा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# राजेश मांगलेकर ठरले देवदूत

## पाणीसंकटात चिखलदऱ्यात मदतीचा हात : टँकरने पाणीपुरवठा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४चिखलदरा,**

चिखलदऱ्यात भीषण पाणीटंचाईमुळे नागरिक, गुरेढोरे आणि पक्षी पाण्यासाठी अक्षरशः वणवण भटकत असतानाच भाजपचे गटनेते राजेश मांगलेकर यांनी माणुसकीचा ध्यास घेत संकटग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. दररोज टँकरद्वारे नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देत ते पाणीबाणीवर प्रभावी मात करण्यासाठी अविरत प्रयत्न करीत आहेत. केवळ नागरिकांपुरतेच नव्हे, तर तहानेने व्याकूळ झालेल्या मुक्या प्राण्यांची आणि पक्ष्यांचीही तहान भागविण्याचे मोठे कार्य राजेश मांगलेकर करीत आहेत. पाणीटंचाईच्या या कठीण काळात त्यांनी उभे केलेले सेवाकार्य चिखलदऱ्यात चर्चेचा विषय ठरला आहे. सर्वसामान्य जनतेसह पशु-पक्ष्यांनाही पाण्यापासून वंचित राहू न देण्याचा त्यांचा निर्धार सर्वांच्या मनाला स्पर्श करणारा ठरत आहे. त्यांच्या कार्यपद्धतीतून जिवंत माणुसकीचे दर्शन घडत आहे. या निस्वार्थ सेवेमुळे राजेश मांगलेकर यांना आज चिखलदऱ्यात ‘देवदूत’ म्हणून संबोधले जात आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचे कौतुक केवळ चिखलदऱ्यातच नव्हे, तर संपूर्ण अमरावती जिल्हाभऱ्यातून होत असून, संकटसमयी धावून जाणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाबद्दल नागरिक कृतज्ञता व्यक्त करीत आहेत.

# मृत शेतकऱ्यांचे वारसदार कर्जमाफीच्या प्रतीक्षेत

## जयसिंग सोसायटी व निबंध कार्यालयाच्या पाठपुराव्यामुळे वारसदारांच्या आशा पल्लवित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४पथ्रोट-** जयसिंग विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे सभासद असलेल्या मृत शेतकऱ्यांना शासनाच्या पहिल्या कर्जमाफीच्या घोषणेत लाभ न मिळाल्यामुळे त्यांच्यावर कर्जाचा डोंगर वाढतच आहे. कर्जमुक्तीकरिता नियमांची पूर्तता करून देखील मागील नऊ वर्षांपासून त्यांचे वारसदार कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असताना आता पुन्हा एकदा कर्जमाफीची घोषणा झाली आहे. अशावेळी सदर यादीमध्ये त्यांच्या नावाला मंजुरी मिळाली की नाही, या प्रतीक्षेत त्यांच्या नजरा यादीकडे लागलेल्या आहेत.

नरेंद्र सहदेवराव नागे, सुरेश नारायणराव उके, प्रल्हाद बाळकृष्ण जवंजाळ, अब्दुल गफार अब्दुल खलील, हरिदास किशन गोरडे, विजय पुंजाराम वंजारी, अंजनाबाई रामलाल रोंगरे, शालिकराम नामदेव हावरे, उत्तमराव रामचंद्र गणगणे, भारत दिगंबर डवरे, दुर्गाबाई कृष्णराव खेडकर व भाऊराव राजाराम गावंडे या १२ मृतक कर्जदार शेतकऱ्यांचा या कर्जमाफीच्या यादीमध्ये समावेश आहे. सदर शेतकऱ्यांनी काढलेल्या कर्जाला महाराष्ट्र शासनाने २०१७ मध्ये पहिल्यांदा कर्जमाफी जाहीर केली होती. त्यावेळी पथ्रोट येथे जयसिंग सोसायटी अंतर्गत एकूण ५५ मृत शेतकऱ्यांचा लाभार्थी म्हणून उल्लेख होता. त्यापैकी ४३ मयत कर्जदार सभासदांना कर्जमाफी करण्यात आली होती. तेव्हापासून सदर यादीमध्ये १२ कर्जदार मृतक सभासद कर्जमाफीपासून वंचित राहिले होते. अशावेळी मृत सभासदांनाही कर्जमाफीचा लाभ मिळावा, याकरिता मृतांच्या वारसांना केवायसी करण्यासाठी सांगण्यात आले होते. त्यावेळी सर्वच बाराही मृतांच्या वारसांनी केवायसीची अट ऑनलाइन पूर्ण करून शासनाकडे दाखल केली होती. परंतु २०१६ पासून सुरू झालेली कायदेशीर लढाई आता २०२६ पर्यंत पूर्ण होऊ शकली नाही. या नऊ वर्षांच्या कालावधीमध्ये मृत शेतकऱ्यांवर असलेले कर्ज फेडण्यासाठी व त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी त्यांच्या वारसदारांनी जयसिंग सोसायटीकडे एकसारखा पाठपुरावा केला. तर त्यांच्या मागणीचा जयसिंग विविध कार्यकारी सहकारी सोसायटीने सुद्धा शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार केला. याबाबत सहायक निबंधक कार्यालयाने जयसिंग सोसायटीकडून अशा वंचित राहिलेल्या बारा मृत कर्जदार शेतकरी सभासदांची यादी मागून घेतली होती. त्यानंतर ती यादी त्यांनी शासनाकडे पुढील कर्जमाफीच्या दृष्टीने प्रस्तावित केली. आता पुन्हा एकदा शासनाने २०१९ पासून कर्जमाफी करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे या कर्जमाफीच्या घोषणेत शेतकऱ्यांच्या नावाची यादी प्रसिद्ध होणार आहे.

त्यामध्ये मृत शेतकऱ्यांच्या नावांना मंजुरी मिळाली. आपल्याबाबत वारसदारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. परंतु यादरम्यान पुन्हा एकदा विधान परिषदेच्या निवडणुकीच्या बिगूल वाजल्यामुळे सध्या तरी हा विषय कधी पूर्ण होईल, याबाबत तर्कवितर्क लावल्या जात आहेत.

# गॅसटंचाईमुळे महिलांची जंगलाकडे धाव

## मेळघाटातील दुर्गम भागात गॅससिलिंडरची टंचाई आणि दरवाढीचा परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४धारणी**

गॅससिलिंडरची टंचाई, वाढती दरवाढ आणि गॅस एजन्सीपर्यंत पोहोचण्यासाठी करावा लागणारा लांबचा प्रवास, यामुळे मेळघाटातील अनेक महिला पुन्हा पारंपरिक चुलीकडे वळल्या आहेत. घरगुती गॅस वेळेवर उपलब्ध होत नसल्याने महिलांना जंगलातून सरपण गोळा करून डोक्यावर २० ते २५ किलोचे ओझे वाहत तीन ते पाच किलोमीटरचा दगड-मातीचा रस्ता पायी पार करावा लागत आहे.

मेळघाटातील अनेक गावांमध्ये गॅससिलिंडरसाठी नोंदणी करूनही दोन-दोन महिने प्रतीक्षा करावी लागत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. गॅस एजन्सी सुमारे ५० किलोमीटर अंतरावर असल्याने सीलिंडर मिळविणे अधिकच जिकिरीचे ठरत आहे. नंबर लागल्यानंतरही तासन् तास प्रतीक्षा करावी लागत असल्याने महिलांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पूर्वी काही गावांमध्ये घरपोच गॅस सेवा किंवा गॅस वितरण केंद्रांमार्फत सीलिंडर उपलब्ध होत होते. मात्र डिझेल, पेट्रोल आणि गॅसच्या वाढत्या दरांमुळे गावोगावी फिरून सीलिंडर पुरविणारी वाहने बंद




### दुर्गम गावांमध्ये नियमित गॅसपुरवठा करा

मेळघाटातील दुर्गम गावांमध्ये नियमित आणि पुरेशा प्रमाणात गॅसपुरवठा करण्यात यावा, घरपोच गॅस वितरण सेवा पुन्हा सुरू करावी, उज्ज्वला योजनेतील लाभार्थ्यांना अनुदान व सवलतींचा लाभ नियमितपणे मिळावा तसेच गॅसची उपलब्धता सुलभ करण्यासाठी गावागावांत अतिरिक्त गॅस वितरण केंद्रे सुरू करण्यात यावीत, अशी मागणी महिलांकडून करण्यात येत आहे.

झाली आहेत. त्यामुळे दुर्गम भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅस उपलब्ध नसल्याने महिलांना पुन्हा चुलीवर स्वयंपाक करावा लागत आहे. यासाठी जंगलातून इंधन गोळा करण्याची कसरत करावी लागते. चुलीच्या धुरामुळे श्वसनाचे विकार, दमा, क्षयरोग (टीबी) तसेच डोळ्यांचे आजार होण्याचा धोका वाढत असल्याचे आरोग्य तज्ज्ञ सांगतात. केंद्र सरकारच्या उज्ज्वला योजनेंतर्गत अनेक महिलांना मोफत गॅस जोडणी मिळाली होती. मात्र सध्या सिलिंडरचे वाढलेले दर आणि वेळेवर उपलब्धता नसल्याने अनेक कुटुंबांना पुन्हा चुलीवर अवलंबून राहावे लागत आहे. सरपण गोळा करण्यासाठी महिलांना जंगलात जावे लागत असून, वाघ, अस्वल यांसारख्या वन्य प्राण्यांच्या दहशतीत हे काम करावे लागत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.